# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०८/२०२५ (मंगळवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयातुन टोळीने गुन्हे करणाऱ्या तीन गुन्हेगारांना करण्यात आले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अन्वये मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. बोरी यांचे कडुन प्राप्त प्रस्तावामधील आरोपी नामे १) विजय बलवंत राय, वय २६ वर्षे, २) संजय बलवंत राय, वय ३२ वर्षे, आणि ३) चौलेश महेंद्र ठाकरे ,वय २१ वर्षे, सर्व रा. कटरे हाउसिंग सोसायटी ,टाकळघाट, ता. हिंगणा ,जि नागपुर यांना नागपुर जिल्यातुन १ वर्षाकरीता हद्दपार केले.**

नमुद आरोपीतांवर दुखापत ,धमकी देणे, अश्लिल शिवीगाळ करणे असे गुन्हे दाखल असुन नमुद तिन्ही आरोपी हे टोळीने गुन्हे करण्याचे सवयीचे आहे. त्यांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी प्राप्त तक्रांरीवरून आरोपीतांवर गुन्हे नोंद करून त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु नमुद तिन्ही आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचे असल्याने ते टोळीने अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितात तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रशन निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा **महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अन्वये हद्दपार** करण्याचा प्रस्ताव एम.आय.

डी.सी. बोरी पोलीसांनी  मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा **यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून १) विजय बलवंत राय, वय २६ वर्षे, २) संजय बलवंत राय, वय  ३२ वर्षे, आणि ३)  चौलेश महेंद्र ठाकरे ,वय २१ वर्षे, सर्व रा. कटरे हाउसिंग सोसायटी ,टाकळघाट, ता. हिंगणा ,जि नागपुर यांना  १ वर्षाकरीता करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**



**संजय बलवंत राय**



**विजय बलवंत राय**



**चौलेश महेंद्र ठाकरे**

## मा.पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी घेतली माजी सैनिक कुटुंब सुरक्षा समितीची बैठक

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत दर महीन्याच्या ५ तारखेला पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नागपुर यांच्या उपस्थितीत नागपुर ग्रामीण जिल्हयातील माजी सैनिकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात येते. सदर बैठकीत नागपुर ग्रामीण जिल्हयातील माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांना असलेल्या अडचणी, तक्रारी असेल तर त्यांचे निराकरण व समाधान केले जाते.

आज दिनांक ०५/०८/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथे झालेल्या माजी सैनिकांच्या बैठकीमध्ये मा.श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, यांनी माजी सैनिकांकडुन प्राप्त तक्रारींबाबत तात्काळ कारवाई करत संबधित विभागाला पत्रव्यवहार करण्यात आले. सदर बैठकीत श्री सत्येंद्रकुमार चौरे, श्री मनोज चव्हाण, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,नागपुर, सहा.पोलीस निरीक्षक श्रीमती माधुरी गायकवाड, प्रभारी

अधिकारी, भरोसा सेल, नागपुर ग्रामीण, पोलीस उपनिरीक्षक ,श्रीमती ज्योत्स्ना गिरी, प्रभारी अधिकारी, मानव संसाधन शाखा, नागपुर ग्रामीण, नागपुर ग्रामीण जिल्हयातील माजी सैनिक आणि इतर पोलीस अंमलदार हजर होते.



## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर**:— दिनांक ०४/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे पथक पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, आठवडी बाजार चौक, कळमेश्वर येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस पथक घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे १) अभंय अंगद सिंग, वय ३१वर्ष, रा. ब्राम्हणी, ता. कळमेश्वर, जि. नागपुर, २)मुन्ना शंकर चमके, वय ४० वर्ष, रा.हुडको कॉलनी, कळमेश्वर,३) नंदकिशोर प्रभाकर ठाकरे, वय ३० वर्ष ,रा. झुनकी सावळी, ता. कळमेश्वर, जि नागपुर ,४) ज्ञानेश्वर जगदीश रेवतकर, वय ४८ वर्ष, रा. कळमशेवर, ५) प्रमोद बापुराव भाकरे, वय ४० वर्ष, रा. कळमेश्वर, हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. घटनास्थळावरून ५२ तास पत्ते , एकुण १९,९३०/— रूपये रोख रक्कम ,चार अॅड्रॉईड मोबाईल किंमती ४०,०००/—रूपये,

दोन दुचाकी किंमती २,००,०००/— रूपये, असा एकुण किंमती २,५९,९३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ५ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १२ (अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना देशीदारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक ०४/०८/२०२५ स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे पथक पोलीस स्टेशन बेला हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा सिर्सी शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक मारुती सुझुकी स्विफ्ट कार क्रमांक एम. एच. ०२ बी.झेड ६९०९ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात देशीदारू मिळुन आली. आरोपी नामे **विशाल नामदेव बहादुरे, वय ४५ वर्षे, आणि आरोपी क्रं २. आकाश शंकर बन, वय २७ वर्षे, दोघेही रा. धोंडेगाव ,ता. समुद्रपुर, जि. वर्धा हे** अवैधरीत्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आले. नमुद आरोपीतांना अधिक विचारपुस केली असता **पाहिजे आरोपी क्रं ३. गोलु पाटील, रा समुद्रपुर, जि. वर्धा याचे सांगणेवरून अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) रॉकेट देशी दारू संत्रा कंपनीची ९० मिली च्या ६०० नीपा, २) कोकण देशी दारू संत्रा कंपनीची ९० मिली च्या ६०० नीपा ३) लावणी देशी दारु संत्रा कंपनीची प्रत्येकी ९० मिलीच्या ४०० नीपा ४) मारुती सुझुकी स्विफ्ट कार क्रमांक एम. एच. ०२ बी. झेड ६९०९ असा एकुण किंमती ५,५४,५००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन बेला येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस भवन येथे घेण्यात आली पोलीस पाटील यांची बैठक

दिनांक ०५/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस भवन येथे पोलीस स्टेशन बोरी, एमआयडीसी बोरी आणि बेला येथील पोलीस पाटील यांची बैठक आयोजीत करण्यात आली होती. श्री अनिल म्हस्के ,अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी नमुद उपविभागातील पोलीस पाटलांची बैठक घेवुन त्यांना आगामी येणाऱ्या जन्माष्टमी, गोपाळकाला, पोळा, गणेश,चतुर्थी(स्थापणा), अनंत चर्तुदशी (विर्सजन) या सणोत्सवाच्या कालावधीमध्ये आणि आगामी निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन गावात शांतता राखावी. तसेच गावात सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्याबाबत, महीला व बालकांच्या सुरक्षेबाबत, गावतील अवैध धंदयावर आळा घालणेबाबत इत्यादी मुद्‌दयांवर मार्गदर्शन करून सुचना देण्यात आल्या. सदर बैठकीत श्री दिपक अग्रवाल , सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग आणि श्री प्रमोद घोंगे, पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा यांनी सुध्दा उपस्थित पोलीस पाटलांना मार्गदर्शन करून सुचना दिल्या. सदर बैठकीस १०० ते १५० पोलीस पाटील हजर होते.





# नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६९३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०५/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६९३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३३ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९७  रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २४ आरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १०० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी  येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार  येथे येथे ३३ आरोपी अशा एकुण १२३ उरेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३३ आरोपी आणि

पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ६९३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**










## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०४/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०५/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत मरामाय नगर, अण्णाभाऊ साठे नगर, पेठ बुधवार, काळे चौक, हत्तीखाना, सावरगाव रोड,भटपुरा येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री बापु रोहोम यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच काटोल टोल नाका येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस स्टेशन काटोल चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.


ADVANCED
9847760530, 8237040536
IIT-JEE
NEET
MHT-CET
11+12
8+9+10
SAFAL ACADEMY
POLICE BHARTI
MPSC
BANKING
RAILWAY/SSC






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने